**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन भाषा मराठीत**

**पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः प्रशांत प्रभाकर पिळणकर,

वयः ३६ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः दमखाडी, रोहा, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. दि. ०१/११/२०१९ रोजी पोलीसांनी मला सरकारी हॉस्पीटल, रोहा येथे बोलाविले होते. तेथे पोलीस हजर होते. सचिन खोपडे यांनी झालेली घटना आम्हाला सांगितली. मळेकर नावाचे व्यक्तीने सचिन खोपडेचे पत्नीची छेड मंदार मेडीकल, शासकीय रुग्णालय रोहा येथे काढली होती. मला मळेकरचे पुर्ण नाव आज आठवत नाही. तो सदर महिलेचा पाठलाग करायचा. तेथे पोलीसांनी माझेसमक्ष छायाचित्रे काढली व पंचनामा तयार केला.

०२. आता मला दि. ०४/०९/२०१८ चा पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ३०** देण्यात येतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एम.एन.शिंदे यांच्यामार्फत सुरू.**

०३. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सुरेश खोपडेला चांगल्या प्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, सचिन खोपडे आज न्यायालयात आलेला आहे, आम्ही दोघे आज न्यायालयात सोबत आलो, मी व तो एकाच आळीमध्ये राहतो, त्याचे सांगण्यावरुन पंचनाम्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे

नाही की, मी त्याचे सांगणेवरुन पंचनाम्यावर सही केली.

०४. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये काय मजकुर नमुद करण्यात आला याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याला गेलो नव्हतो, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष पंचनामा तयार केला नव्हता, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपसणी पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत.

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.07.05 15:31:56 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०५.०७.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.